| | | |
|---|---|---|
| | **विशेष पोलीस वार्तापत्र,**<br>पोलीस अधिक्षक कार्यालय,यवतमाळ<br>दिनांक १२/११/२०२५ | |

## रात्री संशईतरीत्या फिरत असणाऱ्या तसेच तडीपार असलेल्या दोन इसमास,ताब्यात घेवुन केली प्रतिबंध कार्यवाही,

## स्थानिक गुन्हे शाखा , यवतमाळ यांची कार्यवाही

मा.पोलीस निरिक्षक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांचे कार्यलयीन आदेश क्रमांक स्थागुशा/MOB/ फरार पाहिजे,हिस्ट्रीशीटर मोहीम व ऑल आऊट ऑपरेशन/५७८०/२०२५ दिनांक १०/११/२०२५ अन्वेय, कारवाई कामी उपविभाग वणी येथे हजर असतांना दिनांक ११/१२/२०२५ रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाख पथक पोलीस स्टेशन वणी परीसरात गस्त करीत असतांना मुखबीरव्दारे खात्रीशीर माहीती मीळाली की, एक इसम हा दिपक चौपाटी परीसरात अंधाराचा फायदा घेवुन दखलप्रात्र गुन्हा करण्याचे इरादयाने आपले अस्थित्व लपवुन बसुन आहे. अश्या खात्रीशिर माहितीवरुन पथकाने क्षनाचाही विंलब नकरता सदर इसमास योग्य त्या बळाचा वापर करून ताब्यात घेवुन नाव गाव विचारले असता त्याने सदर ठिकाणी आले असल्याबाबत असमाधारन उत्तरे दिल्याने ताब्यात घेवुन इसम नामे **गोपी किशन लोणारे वय ३० वर्षे रा. सेवा नगर वणी** यांचेवर पोलीस स्टेशन वणी येथे कलम १२२ मपोका प्रमाणे कारवाई करण्यात आली. तसेच दिनांक १२/११/२०२५ रोजी पुन्हा मुखबीरव्दारे खात्रीशीर माहीती मीळाली की, यवतमाळ जिल्हा क्षेत्रातुन तडीपार असलेला इसम नामे - साहिल कैलास पुरी वय २२ वर्ष रा. सेवा नगर वणी ता. वणी जि. यवतमाळ हा दखलपात्र अपराध करण्याच्या इराद्याने तडीपार/प्रतिबंधीत क्षेत्र- नेताजी सुभाषचंद्र चौक वणी येथिल देशी दारूचे भटटीजवळपास फिरत आहे. अशी माहिती मिळाली वरून क्षणाचाही विलंब नकरता मा, वरीष्ठांना सदर घटणेची माहिती देवुन सोबत असलेल्या पथकातील पोलीस कर्मचारी सह रवाना होवुन सदर तडीपार इसमाचे शोध कामी सदर ठिकाणी पोहचुन शहानिशा केली असता सदर इसम हाच साहिल कैलास पुरी हा नेताजी सुभाषचंद्र चौक वणी येथिल देशी दारूचे दुकाणासमोर उभा असल्याचे माहीती वरून शहनिशा केली असता तडीपार इसम साहिल कैलास पुरी वय २२ वर्ष हा ऊभा दिसला आम्ही त्यास ओळखत असल्याने लगेच ताब्यात घेतले. सदर इसम हा उपविभागीय दंडाधिकारी सा. नितीनकुमार हिंगोले वणी यांचे न्यायालय, कार्यालयीन आदेश फौजदारी मामला प्रकरण क्रमांक - ०२/२५ मौजा वणी ता. वणी जि. यवतमाळ कलम ५६(१)(अ) (ब) मपोका. पारीत दिनाक २३/०६/२०२५ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनिय कलम ५६ (१)(अ) (ब) अन्वये यवतमाळ जिल्हा क्षेत्रातुन ०६ महिणेकरीता यवतमाळ जिल्हा तथा वणी तालुक्यास लागुन असलेल्या लगतच्या जिल्हयातील तालुके या क्षेत्रातुन हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम **साहिल कैलास पुरी वय २२ वर्ष रा. वणी** याचे वर कलम १४२ मपोका प्रमाणे पोलीस स्टेशन वणी येथे कारवाई करण्यात आली.

सदरची कारवाई ही मा, पोलीस अधिक्षक , यवतमाळ श्री. कुमार चिंता अपर पोलीस अधिक्षक श्री अशोक थोरात, यवतमाळ उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. सुरेश दळवे,उपविभाग पोलीस अधिकारी वणी, यांचे मार्गदर्शनात पो.नि. सतिष चवरे, स्था.गु.शा. यवतमाळ,सपोनि दत्ता पेंडकर, पोलीस पोहवा/२०३९ सुधिर पांडे,पोहवा/२२७२ निलेश निमकर,पोका/१३३६ सलमान शेख, २४९७ रजनिकांम मडावी, चालक पोना/४१७ सतिष फुके, यांनी यशस्वीरित्या पार पाडली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण सुळे पोलीस स्टेशन मारेगाव हे करीत आहे.

(शुभांगी गुल्हाणे )
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्या., यवतमाळ